| | |
|---|---|
| MHNS290021062023 | नंदकुमार मोतीलाल<br>विरूध्द<br>किरण मिलींद व इतर |

**विशेष दिवाणी दावा क्र.३६९/२०२३**
**<u>आदेश निशाणी क्र.३७ वर</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.६ हे दि.१०.०२.२०२३ रोजी मयत झाले असल्यामुळे त्यांचे नांव कमी करून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे पुढे असे म्हणणे आहे की, सदर प्रतिवादी क्र.६ हे प्रतिवादी क्र.९ या कंपनीचे डायरेक्टर होते. म्हणून, त्यांना प्रतिवादी क्र. ९ या कंपनीच्या डायरेक्टर या कॅपॅसिटीमधून वगळण्याची सुध्दा मागणी केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांच्या वतीने म्हणणे दाखल करून योग्य तो आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.६ ते ८ च्या वतीने निशाणी ३६ वर पुरसीस दाखल करून सदर प्रतिवादी हे दि. १०.०२.२०२३ रोजी मयत झाले असल्याचे कळविले आहे. म्हणून, प्रतिवादी क्र.६ हे वैयक्तिकरित्या आणि प्रतिवादी क्र.९ चे डायरेक्टर असल्याने व ते मयत झाले असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे त्यांचे नांव निशाणी १ वरून वगळणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे, सदर प्रतिवादीचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र.७ व ८ हे पुर्वीच प्रतिवादीपणात सामील असल्यामुळे त्यांचे नांव कायम ठेवण्याची मागणीसुध्दा मंजुर करण्यात येते. करीता, मी पुढील आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज (निशाणी ३७) मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.६ यांचे नांव वैयक्तिक प्रतिवादी क्र.६ म्हणून आणि प्रतिवादी क्र.९ चे डायरेक्टर या कॅपॅसिटीतून वगळण्यात येते.

सही/—

( माधव एस. बोराळे )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
इगतपुरी.

दि.१८.०३.२०२४.

(J.O. Code :- MH02022)

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app “**eCourts Services**” from Android or iOS